## निशाणी क्र.१७ वरील आदेश

(CNR No.MHSO220047302023)

वादीने प्रस्तुतचा अर्ज कोर्ट कमिशनरची नियुक्ती करणेबाबत दाखल केला आहे.

२. वादीचे कथन असे की, वादी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुध्द मिळकतीच्या हद्दीखुणा कायम होऊन मिळणेकामी जाहीर ठराव व निरंतर ताकीदीसाठीचा दाखल केला आहे. वादीची दावा कलम १अ गट क्र.१४८/२ ही मिळकत खरेदी मालकीची व दावा कलम १ब गट क्र.१४८/१/अ प्रतिवादीची या मिळकती दरम्यान असणारा दक्षिणोत्तर चालीचा बांध प्रतिवादी यांनी फोडून दावा मिळकतीमध्ये नेमक्या किती जागेवर अतिक्रमण केले आहे हे न्यायालयासमोर येणेकरिता उप अधिक्षक भूमि अभिलेख, करमाळा यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करणेची विनंती केली. वादी कोर्ट कमिशनची फीस भरण्यास तयार आहे. करीता अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादीने अर्जास म्हणणे देऊन पुढे असे कथन केले की, वादीचा अर्ज टेनेबल नाही. कारण वादीने सदरचा दावा हद्दीखुणा निश्चित करेणबाबत व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. अतिक्रमणाबाबत केला नाही. सबब अर्ज रद्द होणेची विनंती केली. तसेच यदाकदाचित मोजणीचा हुकूम झालेस संपूर्ण गटाच्या मोजणीची मागणी केली.

४. प्रस्तुतचा अर्ज, अर्जास म्हणणे, दावा, कैफियत, दाखल कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा मिळकतीच्या हद्दीखुणा कायम होऊन मिळणेकामी जाहीर ठराव व निरंतर ताकीदीसाठीचा दाखल केला आहे. वादीच्या कथनानुसार दावा कलम १अ व प्रतिवादीचे मालकीची दावा कलम १ब या मिळकती दरम्यान दक्षिणोत्तर बांध असून प्रतिवादीने दोन्ही मिळकतीमधील असलेला बांध फोडून दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केले आहे. प्रतिवादीने दावा

मिळकतीमध्ये केलेले अतिक्रमण निश्चित होण्याकरीता दावा कलम १अ व १ब यांच्या दरम्यान असलेल्या दक्षिणोत्तर बांधाच्या हद्दीखुणा निश्चित झाल्यानंतर प्रतिवादीने दावा कलम १अ मध्ये केलेले अतिक्रमण निश्चित होणार आहे. वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीबाबत दोन्ही पक्षकारात वाद नाहीत. केवळ दावा मिळकतीवर झालेले अतिक्रमण निश्चित होण्याकरीता दावा मिळकत १अ गट क्र.१४८/२ तसेच दावा मिळकत परिच्छेद १ब गट क्र.१४८/१/अ या मिळकतीची मोजणी करुन दोन्ही क्षेत्राच्या हददीखुणा निश्चित होतील. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे गट क्र.१४८ चे संपूर्ण क्षेत्र मोजणी झाले तरच वादी व प्रतिवादीचे क्षेत्र निश्चित होईल. गट क्र.१४८/२ तसेच गट क्र.१४८/१/अ या मिळकती दरम्यान असलेला बांधाच्या हद्दीखुणा देखील निश्चित होतील. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे गट क्र.१४८ चे संपूर्ण क्षेत्र मोजणी करणे न्यायोचित्त ठरणार नाही. दोन्ही पक्षकारांनी खरेदी केलेले क्षेत्र हे निश्चित आहे. केवळ गट क्र.१४८/२ व गट क्र.१४८/१/अ या मिळकती दरम्यान असलेला दक्षिणोत्तर चालीचा बांध फोडण्यात येऊन अतिक्रमण झाले किंवा याबाबी निश्चित होण्याकरीता वादी व प्रतिवादीचे क्षेत्र मोजणी करुन दोन्ही मिळकती दरम्यान असलेल्या बांधाच्या हददीखुणा निश्चित करण्याकरीता भूमी अभिलेख खात्यामार्फत मोजणी होणे आवश्यक आहे. सदर मोजणी झाल्यास दोन्ही मिळकती दरम्यान असलेला बांध फोडून दावा मिळकत गट क्र.१४८/२ वर अतिक्रमण झाले आहे किंवा नाही या बाबी स्पष्ट होणार आहेत. वादीचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ च्या कक्षेत येत असल्याचे दिसुन येते. वरील विस्तृत विवेचनाअंती पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. उपअधिक्षक, भूमी अभिलेख, करमाळा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येते. संबंधीत अधिकाऱ्याने अतितात्काळ मोजणी फी घेवून प्रशिक्षीत मोजणीदार यांचे मार्फत मोजणी करण्याबाबत आदेशीत करण्यात येते.

३. वादीने अति तात्काळ मोजणी फी उपअधिक्षक, भूमी अभिलेख, करमाळा यांचे कार्यालयात भरुन आठ दिवसांत अहवाल सादर करावा. तसेच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी.

४. न्यायालयीन आयुक्तांनी मौजे कंदर, ता.करमाळा येथील गट क्र.१४८/२ व गट क्र.१४८/१/अ यांची वादी व प्रतिवादी यांचे समक्ष मोजणी करुन दोन्ही मिळकती दरम्यान असलेल्या दक्षिणोत्तर चालीच्या बांधाच्या हद्दीखुणा निश्चित करुन गट क्र.१४८/२ मध्ये गट क्र.१४८/१/अ च्या धारकाकडून अतिक्रमण झाले आहे किंवा नाही हे दर्शवून तसेच अतिक्रमण झाले असल्यास अतिक्रमणीत क्षेत्र वेगळया रंगाने दर्शवून तसा नकाशा तयार करुन त्यामध्ये सदरच्या हद्दी खुणा चिन्हांकित करुन सविस्तर मोजणी अहवाल नकाशासह अहवाल न्यायालयात एक महिन्याच्या आत सादर करावा.

५. संबंधित लिपिक यांना आदेशित करण्यात येते की, वादीने मोजणी फी भरल्याची पावती तसेच आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केल्याबरोबर भूमी अभिलेख कार्यालय यांचेकडे मोजणीकरीता रिट त्वरीत पाठवावी.

६. वादी व सर्व प्रतिवादीनी मोजणी करिता तालुका भूमी अभिलेख कार्यालय, करमाळा यांचेकडे स्वतः संपर्क साधून मोजणी विहित मुदतीत करण्याकरिता सहकार्य करावे व मोजणी वेळी हजर रहावे.

MEENA PRAKASH EKHE
Digitally signed by MEENA PRAKASH EKHE
Date: 2023.09.02 17:22:20 +0530

( मिना प्र. एखे )
दिवाणी न्यायाधीश व .स्तर, करमाळा

स्थळ – करमाळा
दिनांक – ०२.०९.२०२३

## CERTIFICATE

I affirm that, the contents of the this P.D.F file Order/Judgment are same word to word, as per the original order/ judgment

Name of Stenographer : B.R.Kondekar
Court Name : Civil Court Senior Division, Karmala
Date 02.09.2023

Order/Judgment signed
by the Presiding Officer on : 02.09.2023

Order uploaded on : 02.09.2023